# वनपाल कळवा यांचे कार्यालय, वनपरिक्षेत्र ठाणे वनविभाग ठाणे,

## मौजे गोठेघर ठाणे .जि.जुना मुंबई पुणे हायवे लगत ता ,

विषयः कळवा परिमंडळातील शिळ, मुंब्रा, राबाळे नियत क्षेत्रातील संयुक्त पाहणीचा (मा. डॉ. स्नेहल दोंदे यांच्या नोंदीसह) अहवाल सादर करण्याबाबत.

जा. क्र.: कक्ष /जमीन / २८७ /२०२५-२६

कळवा, गोटेघर, ठाणे ४००६१२ दिनांक: १३ /११/२०२५

मा. वन परिक्षेत्र अधिकारी ठाणे, महोदय
वन विभाग ठाणे

संदर्भ: १. आपल्याकडील समक्ष मोखिक आदेशानुसार दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी कळवा परिमंडळातील वन क्षेत्रात केलेली संयुक्त पाहणी.

२. मा. प्रो. डॉ. (श्रीमती) स्नेहल दोंदे (अध्यक्ष, श्री कृष्णा एज्युकेशन अँड कल्चरल ट्रस्ट, जलनायक, म.रा.) यांनी व्हॉट्सॲपद्वारे सादर केलेली माहिती.

३. शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दि. १४ ऑक्टोबर, २०२२ (चला जाणुया नदीला अभियान).

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषय नुसार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी, मी (वन परिमंडळ अधिकारी, कळवा), श्रीमती प्रियांका इनामदार (वनरक्षक, राबाळे) आणि मा. प्रो. डॉ. (श्रीमती) स्नेहल दोंदे यांनी कळवा परिमंडळातील शिळ, मुंब्रा आणि राबाळे नियत क्षेत्रात संयुक्त पाहणी केली. या पाहणीदरम्यान राबाळे नाल्याचे प्रदूषण आणि गोपाळ पार्क नाल्याचा अभ्यास करण्याच्या अनुषंगाने, शासनाच्या "चला जाणुया नदीला" या महत्त्वाच्या अभियानाचा संदर्भ घेऊन चर्चा झाली.

या पाहणीत खालील प्रमुख व स्थान-विशिष्ट निरीक्षणे आढळली: शिळ संरक्षित वन सं. नं. ६७ (19.141494/73.044007E) येथे बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम सुरू असल्याने, प्रकल्पाचे पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल आणि NOC पूर्तता त्वरित तपासणे आवश्यक आहे. शिळ चेक पोस्ट वनोपज तपासणी नाका (सं. नं. ६४) (19.143104 N /73.046134 E) येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व कर्मचाऱ्यांसाठी संरक्षणात्मक साहित्याची कमतरता आहे. तसेच, शिळ सं. नं. १०२ (19.139440/ 73.035871E) येथे अतिक्रमणाचे चिन्ह आढळले. सोनखार सं. नं. ५० (19.163028N /73.032322E) आणि सोनखार सं. नं. २५ (19.174109N /73.034684E) येथे सीमांकन निश्चित नसल्यामुळे व खाडीलगत कचरा टाकल्यामुळे ठाणे महानगरपालिकेवर (TMC) तातडीने दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. राखीव वन सं. नं. २५६/अ (19.146452N/ 73.017694E) जवळील राबाळे नाल्याचे प्रदूषण तपासण्यासाठी MPCB कडून त्वरित पाणी विश्लेषण अहवाल मागवावा लागेल. यासोबतच, मा. प्रो. डॉ. (श्रीमती) स्नेहल दोंदे (अध्यक्ष, श्री कृष्णा एज्युकेशन अँड कल्चरल ट्रस्ट) यांनी पाहणी दरम्यान आढळलेल्या नोंदी आणि तांत्रिक सूचना संदर्भ क्र. २ नुसार व्हॉट्सॲपद्वारे सादर केल्या आहेत. त्यांच्या जलसंधारण, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनातील महत्त्वपूर्ण अनुभवाचा विचार करून, त्यांनी नोंदवलेली ही सर्व

माहिती व आवश्यक कार्यवाहीच्या शिफारसी, आपल्या माहितीसाठी आणि योग्य निर्देश देण्यासाठी या अहवालासोबत विनम्र विनंतीसह सविनय सादर करण्यात येत आहेत.

वरील महत्त्वपूर्ण निरीक्षणे व शिफारसींच्या आधारावर, शिळ व सोनखार येथील अतिक्रमणांवर तातडीने POR दाखल करून निष्कासनाची प्रक्रिया (Eviction) सुरू करावी, तसेच 'श्री कृष्णा एज्युकेशन अँड कल्चरल ट्रस्ट' सोबत त्रिपक्षीय कराराचा प्रस्ताव त्वरित तयार करावा. याशिवाय, वन विभागाच्या सर्व कार्यालयांमध्ये प्लास्टिक पाण्याच्या बाटल्यांवर पूर्ण बंदी घालून मातीचे माठ (Mud Pots) ठेवण्याचे आदेश तातडीने जारी करावेत, अशी शिफारस माझ्या मोबाईल द्वारे व्हॉट्सअ‍ॅप वर सादर करण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे सर्व माहिती व आवश्यक कार्यवाहीच्या शिफारसी आपल्या माहितीसाठी सविनय सादर करत आहे. यावर उचित कार्यवाहीसाठी आपल्या स्तरावरून योग्य ते निर्देश व्हावेत, ही नम्र विनंती आहे.

आपला विश्वासू,

(वन परिमंडळ अधिकारी, कळवा)